# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 13/03/2021 (शनिवार)
(सकाळ)

---

### जबरी संभोग

पो.स्टे. वेलतुर :– दि. 06/03/2021 चे 17.00 वा. ते दि. 07/03/2021 चे 16.00 वा. सुमारास वय 19 वर्षीय पीडित मुलगी ही तीचे मैत्रीनीकडे आली असता पीडिता ही आपल्या मैत्रीनी बरोबर फिरायला गेली असता परत येतांनी फिर्यादी ही आरोपीचे गाडीवर आली. त्यादरम्यान आरोपीने फिर्यादीचे संमती शिवाय तीचे सोबत शारीरिक संबंध प्रस्तापीत केले. पोस्टे बजाजनगर नागपूर शहर येथील अप क्र 00/21 कलम 376 (2)(एन) भादवी चे कागदपत्रावरून सदर गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री. किशोरकुमार वैरागडे मो.नं 9923795086 हे करीत आहे.

### विनयभंग

पो.स्टे. अरोली :– दि. 12/03/2021 चे 11:20 वा. चे पुर्वी वय 30 वर्षीय पीडित/फिर्यादी हिचे लग्न जुडले असून आरोपी नामे– अनिल शेषराव माटे, रा. धामनगाव हा फिर्यादी मुलीस "तु माझ्या सोबत लग्न कर" असे म्हणुन तीचा हात पकडुन गाडीवर बसविन्याचा प्रयत्न केला. तसेच आरोपी हा फिर्यादीचे घरासमोर सारखा फिरत असतो व तिचा पाठलाग करतो. तसेच आरोपी हा फिर्यादीला म्हणत होता की, "तु माझेसोबत कशी लग्न करीत नाही तुझे लग्न तोडुन दाखविन" असे म्हणुन सारखा पाठलाग करित असतो.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम 354, 354(ड) भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ हंसराज वरखडे 9670031646 हे करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. कुही – दिनांक 11/03/2021 चे 08.00 वा. चे सुमारास पो.स्टे. कुही हद्दीत फिर्यादीयांची 17 वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार नामदेव पुजारी 7775811619 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर